**उच्च व्यवसायिक शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना लागू करण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
**शासन निर्णय, क्रमांक:अविवि-२००९/प्र.क्र. ४६/०९/का.१**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ५ फेब्रुवारी, २००९.

**शासन निर्णय** :-

राज्य शासनाने अल्पसंख्याक लोकसमूह म्हणून घोषित केलेल्या राज्यातील मुस्लिम, बौध्द, जैन, ख्रिश्चन, शीख व पारसी या समाजातील उच्च व्यवसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे इतर बहुसंख्य समाजाच्या उमेदवारांच्या तुलनेत असलेले व्यस्त प्रमाण लक्षात घेवून अल्पसंख्याक समाजातील होतकरू व गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना उच्च व्यवसायिक शिक्षण घेण्यास प्रेरीत करण्यासाठी एक शिष्यवृत्ती योजना राबविण्याची बाब राज्य शासनाच्या विचाराधीन होती. या अनुषंगाने राज्य मंत्रिमंडळाच्या निर्देशाद्वारे मा. मंत्री, अल्पसंख्याक विकास यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीने सूचित केल्यानुसार अल्पसंख्याक समाजातील उच्च व्यवसायिक शिक्षण घेणाऱ्या अर्थिकदृष्ट्या कमकुवत व गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांकरिता पुढीलप्रमाणे शिष्यवृत्ती योजना कार्यान्वित करण्यास शासन मंजुरी देत आहे :-

**अ) योजनेची व्याप्ती** :- अभियांत्रिकी अभ्यासक्रम (पदवी व पदविका), वैद्यकीय अभ्यासक्रम, औषध निर्माणशास्त्र अभ्यासक्रम (पदवी व पदविका), एचएमसीटी अभ्यासक्रम, वास्तुशास्त्र अभ्यासक्रम, पदव्युत्तर व्यवस्थापन अभ्यासक्रम, पदव्युत्तर संगणक अभ्यासक्रम, सनदी लेखापाल अभ्यासक्रम, विधीविषयक अभ्यासक्रम, कृषि विषयक अभ्यासक्रम, दंत वैद्यक अभ्यासक्रम, आयुर्वेदीक अभ्यासक्रम, होमियोपॅथिक अभ्यासक्रम, युनानी अभ्यासक्रम, परिचारक/परिचारिका अभ्यासक्रम, भौतिक उपचार अभ्यासक्रम, दुग्ध व्यवसाय अभ्यासक्रम व मत्स्य व्यवसाय अभ्यासक्रम इ. अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेत असलेल्या राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय असेल.

**ब) योजनेच्या अंमलबजावणीसाठी संचालक, वैद्यकीय शिक्षण तसेच संचालक, तंत्र शिक्षण यांच्या अधिपत्याखाली अल्पसंख्याक कक्षांची निर्मिती** :- या शिष्यवृत्ती योजनेच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी संचालक (वैद्यकीय शिक्षण), वैद्यकीय शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संचालक (तंत्र शिक्षण) तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिनस्त दोन प्रमुख कार्यालया मध्ये स्वतंत्र अल्पसंख्याक कक्ष निर्माण करण्यात येतील. तसेच संचालक (तंत्र शिक्षण) तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्याखालील राज्यातील ६ विभागीय कार्यालयात स्वतंत्र अल्पसंख्याक कक्ष निर्माण करण्यात येतील. दोन प्रमुख कार्यालयात अल्पसंख्याक कक्ष निर्माण करण्यासाठी एकूण रु.१०,५६,०००/- तर सहा विभागीय कार्यालयात अल्पसंख्याक कक्षांच्या निर्मितीसाठी एकूण रु.१३,६८,०००/- एवढा निधी उपलब्ध करून दिला जाईल. या कक्षाच्या निर्मितीसाठी लागणारा कंत्राटी कर्मचारीवृंद, यंत्रसामुग्री, संगणक, प्रिंटर, फॅक्स मशीन, स्कॅनर इ. च्या खरेदीसाठी लागणारा प्रशासकीय खर्च विचारात घेवून आवश्यक ते अंदाजपत्रक संबंधित मुख्य कार्यालये व विभागीय कार्यालयांनी अल्पसंख्याक विकास विभागास सादर करावयाचे आहे.

**क ) उपलब्ध शिष्यवृत्तींची संख्या :-** वैद्याकिय शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकरिता सन २००८-०९ या वर्षात एकूण २२५३ शिष्यवृत्ती उपलब्ध करुन देण्यात येतील, तर वैद्यकीय शिक्षण वगळता उर्वरित उच्च व्यवसायिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेत असलेल्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकरिता एकूण १९४९५ शिष्यवृत्ती उपलब्ध करुन देण्यात येतील. राज्य शासनाने धार्मिक अल्पसंख्याक लोकसमूह म्हणून घोषित केलेल्या अल्पसंख्याक समाजाच्या राज्यातील लोकसंख्येच्या प्रमाणानुसार खालीलप्रमाणे अभ्यासक्रम निहाय शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येतील.

## राज्यातील अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम निहाय वितरीत करावयाच्या शिष्यवृत्तींचा तपशील

| अ.क्र. | अल्पसंख्याक लोकसमुह | वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता उपलब्ध असलेल्या शिष्यवृत्तींची संख्या | वैद्यकीय शिक्षण वगळता उर्वरित उच्च व्यवसायिक शैक्षणिक अभ्यासक्रमात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्तींची संख्या |
|---|---|---|---|
| १ | मुस्लिम | १,२२७ | १०,६२५ |
| २ | बौध्द | ६८७ | ५,९४६ |
| ३ | ख्रिश्चन | १३५ | १,१७० |
| ४ | जैन | १५८ | १,३६५ |
| ५ | शीख | २३ | १९५ |
| ६ | पारसी | २३ | १९४ |
| | **एकूण** | **२,२५३** | **१९,४९५** |

**ड ) योजनेच्या अटी व शर्ती** :-

१) सन २००८-०९ या वर्षात नव्याने प्रवेश घेतलेल्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती योजना लागू असेल मात्र केंद्र शासनाने सुरु केलेल्या गुणवत्ता-नि-साधन आधारित शिष्यवृत्ती योजनेचा लाभ ज्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना मिळत असेल त्यांना या योजनेचा लाभ देता येणार नाही.

२) उपरोक्त **अ** मध्ये नमूद केलेल्या विविध अभ्यासक्रमामध्ये सामाईक प्रवेश चाचणीद्वारे (सीईटी) प्रवेश घेतलेले विद्यार्थी या योजनेसाठी पात्र ठरतील.

३) जे विद्यार्थी सामाईक प्रवेश चाचणी (सीईटी) न देता उक्त अभ्यासक्रम शिकत असतील, ते विद्यार्थी देखील या योजनेचा लाभ घेण्यास पात्र ठरू शकतील. तथापि, अशा विद्यार्थ्यांची निवड त्यांनी उच्च माध्यमिक / पदवी परीक्षांमध्ये प्राप्त केलेल्या गुणांनुसार गुणवत्तेवर आधारित राहील.

४) संबंधित अल्पसंख्याक विद्यार्थी ज्या शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेत असेल, त्या अभ्यासक्रमाकरिता आकारण्यात येणाऱ्या वार्षिक शैक्षणिक शुल्काच्या ५०% किंवा रु.२५,०००/-, या पैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम शिष्यवृत्ती म्हणून देण्यात येईल.

५) विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा व त्यांनी शालांत परीक्षा महाराष्ट्र राज्यातुन उत्तीर्ण केलेली असावी.

६) मागील वर्षाच्या निधीचे उपयोजिता प्रमाणपत्र (Utilisation Certificate) संचालक, (वैद्यकीय शिक्षण), वैद्यकीय शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संचालक (तंत्र शिक्षण) तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून प्राप्त झाल्यानंतर अल्पसंख्याक विकास विभागाकडून पुढील वर्षाचा निधी मुक्त केला जाईल. याबाबत अल्पसंख्याक विकास विभागाकडून किंवा त्यांनी विहित केलेल्या अभिकरणांमार्फत वार्षिक तपासणी केली जाईल.

७) या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.२.५० लक्ष किंवा त्यापेक्षा कमी असावे.

८) स्वयंरोजगार असलेल्या पालकांचे उत्पन्नांचे प्रतिज्ञापत्र हे स्व-प्रमाणपत्र स्वरुपाचे नॉन ज्युडिशियल स्टॅम्प पेपरवर असणे आवश्यक आहे. नोकरी करणाऱ्या पालकांच्या बाबतीत नियोक्त्याकडून उत्पन्नाचा दाखला प्राप्त करुन घेण्यात यावा. विद्यार्थ्याचे पालक उत्पन्न कर भरत असल्याचे आयकर विवरणपत्राची सत्यप्रत देखील उत्पन्नाचा दाखला म्हणून ग्राह्य धरण्यात येईल.

९) या योजनेत ३० टक्के जागा मुलींसाठी राखून ठेवण्यात येतील.

१०) एखाद्या अल्पसंख्याक समाजातील मुलींची संख्या लाभार्थीमध्ये कमी असल्यास त्या अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी त्या जागा समायोजित कराव्यात.

११) विद्यार्थ्यांकडून शिष्यवृत्ती योजनेच्या कोणत्याही अटी व शर्तीचा भंग झाल्यास शिष्यवृत्ती स्थगित करण्यात येईल अथवा संपुष्टात आणण्यात येईल. या योजनेच्या अटींचा भंग झाला असल्याची शासनाची खात्री पटल्यास संबंधित विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती रद्द करण्यात येईल.

१२) जर एखाद्या विद्यार्थ्यांस चुकीच्या माहितीच्या आधारे शिष्यवृत्ती दिली गेल्याचे निदर्शनास आल्यास त्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती तात्काळ रद्द करण्यात येईल व त्यास प्रदान करण्यात आलेल्या शिष्यवृत्तीच्या रकमेची वसूली करण्यात येईल.

**ड) योजनेची प्रसिध्दी, शिष्यवृत्ती अर्जांची उपलब्धता व योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती:-** या योजनेची जाहिरात व प्रसिध्दी "अल्पसंख्याकांच्या समस्यांबाबत संशोधन, प्रशिक्षण व योजनांना प्रसिध्दी" या योजनेमध्ये प्रसिध्दी व इतर बाबींसाठी राखून ठेवलेल्या तरतुदीतून तसेच इतर उपलब्ध तरतूदीतून करण्यात येईल. ही प्रसिध्दी राज्यातील प्रमुख वृत्तपत्रातून तसेच अल्पसंख्याक बहूल क्षेत्रातील मोठया खपाच्या वृत्तपत्रातून व अल्पसंख्याक भाषेतील वृत्तपत्रातून करण्यात येईल. या जाहिरातीमध्ये शिष्यवृत्ती मिळण्यास पात्र ठरणाऱ्या संबंधित विद्यार्थ्यांचे राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडण्याबाबत सूचित करण्यात येईल.

या योजनेतंर्गत शिष्यवृत्तीच्या अर्जाचा नमूना महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे. तसेच शिष्यवृत्ती अर्जांची मर्यादीत प्रमाणात छपाई देखील राज्य शासनाकडून करण्यात आली आहे. छापील शिष्यवृत्ती अर्ज सर्व जिल्हाधिकारी कार्यालये, जिल्हा परिषद कार्यालये, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ व मिटकॉन यांच्या कार्यालयात वितरणासाठी मोफत उपलब्ध करुन देण्यात येतील. शिष्यवृत्ती मिळण्यासाठी इच्छुक असलेल्या संबंधित अल्पसंख्याक उमेदवारांनी शासनाच्या संकेतस्थळावून शिष्यवृत्ती अर्जाचा नमुना डाऊनलोड करावयाचा आहे अथवा वर नमूद केलेल्या शासकीय कार्यालयामधून छापील अर्ज उपलब्ध करुन घेऊन अर्जासोबत आवश्यक असलेले कागदपत्र जोडून पूर्ण भरलेले अर्ज दि.२६.२.२००९ पूर्वी ते शिकत असलेल्या महाविद्यालयांच्या प्राचार्यांकडे सादर करावयाचे आहेत. वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या उमेदवारांचे अर्ज संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी संचालक, वैद्यकीय शिक्षण यांच्याकडे दि.२६.२.२००९ पूर्वी सादर करावयाचे आहेत, तर वैद्यकीय शिक्षण वगळता उर्वरित उच्च व्यवसायिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेत असलेल्या उमेदवारांचे अर्ज संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी दि.०४.०३.२००९ पूर्वी सहसंचालक, तंत्र शिक्षण यांच्याकडे सादर करावयाचे आहेत. वैद्यकीय शिक्षण वगळता उर्वरित उच्च व्यवसायिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेत असलेल्या उमेदवारांकडून प्राप्त झालेल्या अर्जांची प्राथमिक छाननी संचालक, तंत्र शिक्षण यांच्या अधिनस्त असलेल्या सहा विभागीय कार्यालयात निर्माण करण्यात आलेल्या अल्पसंख्याक कक्षांनी करुन आपल्या शिफारशींसह संचालक, तंत्र शिक्षण यांच्या अधिनस्त असलेल्या प्रमुख कार्यालयातील अल्पसंख्याक कक्षाकडे दि.८.३.२००९ पूर्वी पाठवावयाचे आहेत. वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या उमेदवारांकडून प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी संचालक, वैद्यकीय शिक्षण यांच्या अधिनस्त असलेल्या मुख्य कार्यालयातील अल्पसंख्याक कक्षाने करावयाची आहे. तद्नंतर या शासन निर्णयाद्वारे विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार शिष्यवृत्ती मिळण्यास पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची

निवड संचालक, तंत्र शिक्षण व संचालक, वैद्यकीय शिक्षण यांच्याकडून करण्यात येईल व  शिष्यवृत्ती मिळण्यास पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची यादी संबंधित संचालकांमार्फत त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. शिष्यवृत्ती मिळण्यास पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तींची रक्कम अदा करण्याच्या दृष्टीने संचालक, तंत्र शिक्षण व संचालक, वैद्यकीय शिक्षण यांच्याकडून संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांमार्फत त्या त्या उमेदवारांच्या बँक खात्यात जमा केली जाईल. या शिष्यवृत्ती योजनेतंर्गत उपलब्ध असलेला सर्व निधी संचालक, तंत्र शिक्षण व संचालक, वैद्यकीय शिक्षण यांच्या अधिनस्त ठेवण्यात येईल. संचालक, तंत्र शिक्षण यांच्या अधिनस्त रु.३२.५४ कोटी एवढी रक्कम ठेवण्यात येईल. तर संचालक, वैद्यकीय शिक्षण यांच्या अधिनस्त रु.३.७६ कोटी एवढी रक्कम ठेवण्यात येईल.

**इ ) शिष्यवृत्ती अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे** :- शिष्यवृत्ती अर्जासोबत खालील प्रमाणपत्रे / प्रतिज्ञापत्रे जोडण्यात यावी.

१) विद्यार्थ्याची स्वतःची स्वाक्षरी असलेली पासपोर्ट आकाराचे छायाचित्र.

२) विद्यार्थ्याने शालांत परीक्षा व त्यापुढील परीक्षांमध्ये अर्जित केलेल्या गुणांची गुणपत्रिकांच्या साक्षांकीत प्रती.

३) स्वतःचा व्यवसाय असलेल्या पालकांच्या बाबतीत उत्पन्नाच्या सर्व स्त्रोतांद्वारे मिळणाऱ्या वार्षिक उत्पन्नाविषयीचे अ-न्यायीक स्टॅम्प पेपरवरील घोषणापत्र / नोकरीस असलेल्या पालकांच्या बाबतीत नियोक्त्यांकडून प्राप्त केलेला उत्पन्नाचा दाखला किंवा आयकर विवरणपत्राची सत्यप्रत.

४) कायम निवासाच्या पत्त्यासंबंधी पुरावा उदा. शिधापत्रिकेची प्रत, वीज/दूरध्वनी देयकाची प्रत, पारपत्राची प्रत, निवडणूक ओळखपत्राची प्रत इ. (कोणतीही एक)

५) आगाऊ पावतीची प्रत. (Advance Receipt)

सदर योजनेच्या अंमलबजावणीची पूर्ण जबाबदारी संचालक, (वैद्यकीय शिक्षण),  वैद्यकीय शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संचालक (तंत्र शिक्षण) तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची राहील.

सदरहू योजनेची अंमलबजावणीकरता संचालक (वैद्यकीय शिक्षण), संचालक (तंत्र शिक्षण), संचालक (उच्च शिक्षण) आणि संचालक (कृषि) यांनी आपल्या अधिपत्याखालील शैक्षणिक संस्थांना अवगत करावे.

या योजनेसाठी योजना संकेतांक व अनुदान वितरणाचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

हे आदेश उच्च व तंत्र शिक्षण विभाग व वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांच्या सहमतीने आणि  वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ अनुक्रमे क्र.७४/व्यय-४/०९, दि. ५.२.२००९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (www.maharashtra.gov.in) उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००९०२०५१७४९३७००१  असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( एस. एस. काद्री )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

मा. राज्यपालांचे सचिव,
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
मा. उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व मंत्रालयीन विभाग
संचालक, उच्च शिक्षण, पुणे
संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई
संचालक, वैद्यकीय शिक्षण, मुंबई
संचालक (कृषि), कृषि संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
संचालक (शिक्षण), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय (प्रसिध्दीसाठी)
निवडनस्ती.

* पत्राने.

# GOVERNMENT OF MAHARASHTRA

## Minorities Development Department

**Form of Application for Scholarship Scheme for Minority(Muslim/Christian/Parsi/Buddhist/Jain/Sikh) Students for pursuing Technical & Professional Studies**

**For Office Use Only**

**SL. No. of Application** ______ **Year** ______ **Course** ______

**Whether approved ?** **YES /NO** ______

Paste Latest Passport Size Color Photo with Signature. Do not Staple.

**1. Personal Details**

a. Full Name: ______

*( As appeard in the HSC/Equivalent Examination)*

b. Fathers' / Husbands' Name ______

c. Mothers' Name ______

d. Domicile State : ______ e. Nationality: Indian

f. Address for correspondence ______

P I N ______

g. Tel. No. (With STD) ______ - ______

h. E-Mail ______

i. Gender ______ (M-Male/F-Female)

j. Date of Birth ___ / ___ / ______ ( D D / M M / Y Y Y Y )

k. Religion ______ (Muslim/Christian/Parsi/Buddhist/Jain/Sikh)

**2. Qualification Details ( SSC Onward)**

| SN | Examination Passed | University / Board Institution / Council of Examination | Year of Passing | Percentage of marks |
|---|---|---|---|---|
| *1* | **SSC** | | | |
| *2* | **HSC** | | | |
| *3* | | | | |
| *4* | | | | |

**3. Total Annual Course fee in Rs. (Do not include refundable deposits)**

Tution Fees ______ Dev. Fees ______ Other Fees ______ Total ______

**Total in words : Rs.** ______________________________

**4. Details of Saving Bank account of Students**

a. Name of the Bank : ______

b. Full Address ______

PIN ______

c. Branch Code ______ **d**. A.c No ______

d. MICR NO. of the Bank ______

**5. Annual Income of Parent / Guardian of the student : Rs. ____________________**

(Specimen form of declaration of annual income and minority status on Rs. 100/- non judicial stamp paper is given at Annexure I which is to be signed by the studnet and parent /Guardian of the student. In case parent / guardian are employed, income certificate from the employer may also be enlcosed)

**6. a.Course Name :** ________ **b. Year of Study :** ________

**c.** Admission on the Basis of Competative exam (Y/N) ☐ If yes, name of CET ________

**7 Name of the College / Instituion where admitted :**

a. College Name : ________

b. College Address ________

c. Telephone No. ☐☐☐☐☐☐☐☐☐☐ d. Fax No. ☐☐☐☐☐☐☐☐☐

e. Email Address : ________

f. Is the college / institution recognized. ( Yes / No) ☐

g. If yes the name of authority which has recognised the instituions :

________

h. To which University / Board is it affiliated :

________

**8 Documents enclosed with the application**

i) Attested certificates of educational qualification as filled up in para 2.

ii) Income declaration - affidavit on Rs. 100/- non-judicial stamp paper and income certificate from the employer, if any

iii) Proof of permanent residence ( Domicile Cettificate / Ration Card/ Driving Licence / Electricity Bill/ Indian Passport/ Election ID/ Telephone Bill/ etc)

**9. Declaration**

a I hereby declare that the information given above is correct.

b I shall abide by the terms and conditions for sanction of Scholarship for Minority Students for pursuing Technical & Professional Studies

c I undertake, if it is found that the information given by me is false or if I violate the terms and conditions of the scholarship, the scholarship sanctioned to me, may be cancelled and the entire amount of scholarship will be refunded by me or recovered from me, apart from liability for such penal action as warranted by law.

**Date :** ________

**Place :** ________

**Signature of Candidate**

Name ( ______________________________)

---

**( Proforma is filled by the Institute / College Head with official seal)**

**10. Verification of information to be furnished by the Head of Instituion / College :**

It is certified that the information filled above by Shri / Smt. / Kumari ______________________________ S/O. D/O, W/O Shri ______________________ ________________ who is admitted in course ________________________ for the academic year ________ in college is correct.

**Date :** ____ / ____ / ____

**Place :** ________

**Signature of the Head of Institution / College with official seal.**

**Annexure -I**

# DECLARATION OF FAMILY INCOME AND MINORITY STATUS

(On Rs. 100 Non Judicial Stamp Paper to be attached in original to )

I ……………………………………………………………(Father /Mother/ Guardian) of……………………………………………………...……………(Name of Student) who is studying in...............................................…………………………………..hereby declare that my annual income from all sources is Rs ..………………………………… in word Rs. ………………..…..…………………………………………………………..only.

I also declare that I belong to _________________ minority community declared as Minority Community by Government of Maharashtra, General Administrative Department Notification No. RAA/2005/89/C.R.19/2005, dtd 9th November, 2006.

If at any stage, it is found that the information given by me is false/not true, all benefits given to the student under the scheme of "*Scholarship Scheme for pursuing Technical & Professional Studies to the students belonging to Minority Communities*" could be withdrawn and legal action as deemed fit, may be taken against me or my ward.

**Signature**
**Student**

**Signature**
**(Mother/Father/Guardian)**

**Date : ……………………**

**Residential Address :**

.........................................................................................
.........................................................................................
.........................................................................................
.........................................................................................

## Annexure -II

## Receipt

Received the scholarship through ECS on Bank Account No. ____ __ ______ ____ _____ ___ of _________________ branch _________ / Cheque No. ___ _____ dated _________ for Rs. __________/- (Rs.____________________________________________________only ) toward the *Scholarship for pursuing Technical & Professional Studies to the students belonging to Minority Communities for the year _________________ .*

*(Name of Student)*

*Signature of the Student with*

*Revenue Stamp*